# केरी-सत्तरी येथील राम गावस यांना पीएचडी



**वेर्णा : डॉ. राम गावस यांना पीएचडी प्रदान करताना बिट्स पिलानी गोवा कॅम्पसचे व्हाईस चॅन्सलर प्रो. सौविक भट्टाचार्य.**

वार्ताहर
पर्ये

केरी-सत्तरी येथील घोटेली नं. १ हड्डेचो कणो येथील राम उत्तम गावस यांना राजस्थान विद्यापीठाची पीएचडी पदवी प्राप्त झाली आहे. बिट्स पिलानी गोवा कॅम्पसमधून रसायनशास्त्राच्या प्राध्यापिका अमृता चॅटर्जी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन केले. यापूर्वी त्यांचे सहा पेपर्स संबंधित विषयाच्या ख्यातनाम जर्नल्समध्ये प्रसिद्ध झाले आहेत. नऊ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांत त्यांनी सहभाग घेतला. त्यांना दिल्लीच्या सीएसआयआरची एसआरएफ शिष्यवृत्तीही प्राप्त झाली होती. २०२० साली राष्ट्रीय परिषदेत वक्ता म्हणून त्यांना प्रथम पारितोषिकही प्राप्त झाले आहे.

त्यांनी आसगाव म्हापसा येथील ज्ञानप्रसारक कॉलेजमधून फार्मासिट्युकल्स केमेस्ट्रीमध्ये एमएससी पदवी प्राप्त केली. सध्या ते तासिका तत्त्वावर सांखळी सरकारी महाविद्यालयात साहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांना बिट्स पिलानी गोवा कॅम्पसचे व्हाईस चान्सलर प्रो. सौविक भट्टाचार्य यांच्याहस्ते पदवी प्रदान करण्यात आली. या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.